# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकनृत्ये

**प्रा. सुहास सूर्यकांत आजगांवकर**
मुंबई-४०००६७
Mob.No. – ९५९४३४३६५४

---

अभिजात निसर्ग सौंदर्याने नटलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्याला सौंदर्याबरोबर लोककलांचा एक समृद्ध वारसा लाभलेला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'दशावतार' हा लोकनाट्यप्रकार होय.या लोकनाट्याबरोबरच लोकनृत्यांची ही एक समृद्ध परंपरा या जिल्ह्याला लाभलेली आहे.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग,सावंतवाडी,वेंगुर्ले,कुडाळ,मालवण, कणकवली, देवगड आणि वैभववाडी या तालुक्यातील गावांमध्ये फुगडी, धालोनृत्य, गोफनृत्य, चपयनृत्य,धालोनृत्य,घुमटनृत्य, राधा नृत्य,कापड खेळे, फाग नृत्य असे विविध नृत्यप्रकार वेगवेगळ्या काळात सादर केली जातात. इथल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात या लोकनृत्य प्रकारांना अनन्यसाधारण महत्त्व असलेले दिसते. हे सर्व लोकनृत्यप्रकार नागपंचमी, गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी, शिमगा या सणा उत्सवाच्या निमित्ताने सादर करतात. मुळात या सण उत्सवांमधुन सामाजिक एकोपा साधण्याबरोबरच लोकसंस्कृती व लोककलांचे जतन व संवर्धन होताना दिसते.

लोकनृत्यांना लोकगीतांची जोड दिलेली असते.लोकगीतांच्या लय तालावर सर्व लोकनृत्यप्रकार सादर करतात.या गीतांमधून लोकजीवन,लोकसंस्कृती,देवा धर्माबद्दलची श्रद्धा यांचा आविष्कार झालेला दिसून येतो. लोकगीतांचे स्त्री गीते, पुरुषांची खेळगीते, धनगरांची चपई नृत्यगीते अशी वर्गवारी करता येते. नागपंचमी,गणेश चतुर्थी ,धालो उत्सव यावेळी स्त्रियां नृत्य करताना जी गीते गातात त्यांना स्त्री गीते म्हणतात.तर चपई नृत्य, गोप नृत्य, घुमटनृत्य, कापडखेळे,फागनृत्याच्यावेळी जी गीते गातात त्यांना पुरुष गीते असे म्हणतात.तसेच लोकनृत्यापैकी नागपंचमी,गणेश चतुर्थीच्यावेळी झिम्मा,फुगडी खेळतात.धालोत्सवात तसेच सादर केली जाणारी नृत्ये ही स्त्री नृत्ये म्हणून ओळखली जातात. तर गोपनृत्य, चपई नृत्य, घुमट नृत्य, राधानृत्य,कापडखेळे , फागनृत्ये यांना पुरुष नृत्ये म्हणून ओळखले जाते. वरील दोन्ही नृत्यप्रकार हे सण उत्सवाच्या वेळी सादर केले ज़ातात. तसेच अलीकडच्या काळात सिंधुदुर्ग जिल्हात, झिम्मा, फुगडी,चपई नृत्य यांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते त्यावेळी सादरीकरण होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात नागपंचमीच्या सणाच्या वेळी वारुळाची पूजा करण्याची प्रथा आहे. उपवास केलेल्या मुली, स्त्रिया वारुळासमोर गीत गात फेर धरून नाचतात. लोकजीवनात नागाला स्त्रीचा भाऊ मानला आहे म्हणून आपल्या भावाकडे स्त्री आपल्या पतीसाठी आयुष्य मागताना दिसते.

उदा. नाग भाऊराया तुला नैवेद्य लाह्या गुळाचा
तूच रक्षक रक्षक माझ्या कुंकवाचा.

या लोकगीतामध्ये गेयता,लय,ताल यांचा सुमेळ साधल्यामुळे नृत्याचे पदन्यास हाताच्या हालचाली सहजपणे होतात. मुळात ही लोकगीते विलंबित (संथ चालीवर) लयीतील असल्याने नृत्याची गती संथ असते. या गीतामध्ये अंत्य यमक साधलेला आहे.परंतू प्रतिमा,प्रतीकांचा वापर केलेला दिसत नाही

गणेश चतुर्थीच्या काळात रात्रीच्या वेळी स्त्रियांना मोकळीक असते. त्यामुळे आजूबाजूच्या घरातील

बायका एकत्र जमून झिम्मा,फुगडी गणपतीसमोर सादर करतात.फुगडी लोकगीतातून भक्तिभाव, कौटुंबिक सुख-दुःख, सासर-माहेरच्या नातेसंबंधाबरोबर लोकसंस्कृती, प्रथा,परंपरा आदीचे दर्शन घडते.

उदा.  गणपती देवा करीन तुझी सेवा
नवस करीन देवा नवस करीन रे
पाच फुलांनी , पाच मुळव्यांनी दुर्वा वाहीन रे
गळयातलं  मंगळसूत्र दे जन्मभर
आणि काय मागणं रे.

सिंधुदुर्ग जिल्हा डोंगराळ असल्यामुळे माहेरच्या माणसांना सासरी गेलेल्या मुलीविषयी काळजी वाटते. तेव्हा त्या सासुरवाशीण मुलगी सांगते,

शेत माझे डोंगरी गं,आहे तिथे माझे माहेर ग तेथे माझे माहेर
बाबा विचार करती ,लेक माझी एकटी गं
नाही बाबा एकटी ,मी सासरे माझ्या संगती

सासरच्या माणसांकडून लाभणारा आधार, प्रेम  सून व्यक्त करताना दिसते असे कौटुंबिक नाते या गीतातून व्यक्त होते.

बाय मी कशी, बाय मी कशी
कपाळी, कुंकू, लक्ष्मी जशी –

हे झिम्मा गीतही स्त्रीच्या अस्तित्वाचा वेध घेताना दिसते. फुगडी व  झिम्मा गीताच्या रचना अनुप्रास, यमक अलंकारात आहेत. तसेच ही गीते गेयात्मक असल्यामुळे त्यांना लयबद्धता प्राप्त होते. ही गीते द्रुत व विलंबित लयीत गायिली जात असल्यामुळे  नृत्येही द्रुत विलंबित लयीत सादर होतात. गेयता, नादमाधुर्य,लय,ताल ही गीतांची पर्यायाने नृत्याची वैशिष्ट्ये सांगता येतील.

दसऱ्याच्या वेळी सादर होणा-या चपई नृत्यांमध्ये सुरुवातीला धनगर समाजाच्या देव देवतांची नावे घेऊन चांगभलं केले जाते. यावेळी ढोल, टाळ, थाळी यांच्या नादावर चपई नृत्य केले जाते. पण नंतर नृत्यगीताची लय बदलते तशी ढोल थाळीची लय बदलते आणि नृत्याची गती वाढते.

उदा. हरssहरss बोले हरss हरssबोले
हरss  हरss  बोला.

या गीताची लय वाढते तसे यातील अक्षररहित मात्रा कमी होतात.

उदा. हरबोले, हरबोले,हर हर बोला.

चपई नृत्यात बांदा,पडवे-माजगाव, कुडाळ भागातील धनगर समाजाच फक्त सहभागी होतो. नृत्याच्या वेळी पांढरे धोतर व पांढरी सलवार त्यावर पायघोळ झगा,झग्यावर लाल रंगाचे पट्टे, अर्ध चंद्र तारे असे नक्षीकाम असते. डोक्याला पांढरे मुंडासे वा फेटा असतो. पायात घुंगरू बांधलेले असतात. हातात वेताची काठी असते. नृत्य करणारे गोलाकार उभे राहून नृत्य करतात. नृत्य करणारे आणि ढोल, थाळी वाजवणारे यांच्या डोक्याला पिवळा भंडारा लावलेला असतो. अलीकडच्या काळात चपई नृत्याच्या स्पर्धांमध्ये एखाद दुसरा धनगर पुरुष आपल्या मूळ वेशात म्हणजे काष्टी, मुंडासे, जाकिट, कमरेला कोयता,मनगटात चांदीचे कडे व हातात काठी अशी वेशभूषा केलेली असते.

सिंधुदुर्ग जिल्हात सादर केला जाणारा स्त्रियांचा एक उत्सव म्हणजे धालोत्सव ह्याचे वैशिष्ट्य म्हणजे विवाहित स्त्रियाच यात सहभागी होतात. वनदेवता, निसर्गदेवता यांचा मांड भरवून भूमातेची पूजा करण्याचा हा विधी म्हणजे धालो होय. साधारण पौष महिन्यात हा धालो उत्सव साजरा केला जातो. विवाहित स्त्रिया दोन गट करून(फाट्या) वेगवेगळी नृत्यगीते सादर करतात. पहिल्या गटातील स्त्रियां एकमेकांचे हात पकडून गीत गात थोडे समोर जातात. यानंतर समोरील दुसरा गट तसेच एकमेकांचे हात पकडून स्त्रियां गीत गात पुढे येतात. धालोत्सवात हातात हात गुंफून दोन्ही पाय मागे पुढे करीत स्त्रियां नृत्य करतात.

उदा. गट १- आर्तिक महिना कार्तिक महिना, मालनी पूनवी आनंद झाला गे

गट- झाल्या झाल्या बरा झाला तुळशीची जागा आम्ही बेंदू गे

धालोत्सवात प्रथम तुळशीच्यासमोर मांड मांडला जातो. तुळस, भूमी आणि वनदेवता यांचे रूप मानून जागर केला जातो.मांड मांडल्यानंतर काही मुली देवी आणि रंभेचे रूप घेऊन आल्यानंतर नृत्यनाट्याला प्रारंभ होतो. तत्पूर्वी तुळशी समोर, नारळ वाढवला जातो. धालोत्सव सात दिवसांचा असतो. दररोज मांडावर बायका नृत्य करत असतात. शेवटच्या सातव्या दिवशी दोन विवाहित स्त्रियांना वधू-वर म्हणून सजवून त्यांचा विवाह केला जातो. त्यानंतर पारध म्हणजे डुक्कर मारण्याचा कार्यक्रम होतो. एक स्त्री पिंगळा बनून पहाटे काही घरात दान मागते. असे विधी नाट्यात्मक हे कार्यक्रम होतात. आठव्या दिवशी सकाळी पुन्हा नृत्य सादर केले जाते. इतर स्त्रीयांचे नवस बोलणे, मांड शिंपणे आदी विधीनंतर धालोत्सव समाप्त होतो.

शिमग्याला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही गावांमध्ये घुमट नृत्य, राधा नृत्य वगैरे सादर होतात. होळी पौर्णिमेच्या नंतर गावाचा मुख्य चव्हाटा असतो तिथे मांड मांडलेला असतो. घुमटवादक व गायक अर्ध गोलाकार उभे राहतात.आणि-

उदा. एsss ओsss नsssमsssन रेsss बा

श्री sssगsssणेsssशा प्रssथssम ssशेss

प्रथम श्री गणेशा स्तवनाने घुमटनृत्याला प्रारंभ होतो. वरील पंक्तीचे पुन्हा पुन्हा आवर्तन केले जाते. त्यावेळी विलंबित लयीवर नर्तक नृत्य करतात. यावेळी घुमटवादक व गायक अर्ध गोलाकार उभे राहतात.गणेश स्तवनानंतर घुमटवादक आणि गायक श्रीविष्णूचे नामस्मरण करतात.

उदा.श्रीsssभssगssवंssत माsssयाsssहो||

ह्या पंक्तीचे आवर्तन ४-५ वेळा होते,तेव्हाही नृत्य सुरुच असते. चव्हाट्यावर घुमट नृत्याला प्रारंभ होतो. त्यानंतर ग्रामदेवतेची निशाणकाठी ,घुमट वादक, गायक, ढोल असा मांड गावात वाडीनिहाय घरोघरी भेट देतो. त्यावेळी घुमटवादक, नाट्यगीत वा अन्य गीत गातात.त्याच्या तालावर घुमटवादन केले जाते.

नारायणा रमा रमणा

मधुसूदना ss मनमोहना करुणाकरा

या गीताच्या तालावर घुमटवादक घुमटावर पूरक असा ठेका(त्रिताल, झपताल,एकताल) वाजवतात व नर्तक नृत्य करतात. अलिकडच्या काळात. फक्त चव्हाटयावरील मांडावरच नर्तक नृत्य करतात. शिमग्याला ग्रामदेवतेच्या मांडाबरोबर राधाकृष्ण सोंगे किंवा अन्य सोंगे गावातील लोकांच्या घरी शबय (पैसे) मागण्यासाठ जातात त्यावेळी वेगवेगळ्या गीतांच्या तालावर राधाकृष्ण ही सोंगे नृत्ये करतात. तबला व हार्मोनियमच्या जोडीने

गीत-नृत्ये सादर केली जातात.

शिमग्याच्यावेळी देवगड तालुक्यातील पुरळ,नाडण,किंवा इतर गावांमध्ये कापड खेळे सादर होतात. प्रथम गावच्या मुख्य चव्हाटयावर कापडखेळे नृत्य करतात.त्यावेळी प्रथम-

उदा. जोय जातारे जोय जाता

प्रथम नमिले गणपती मी

असे म्हणून प्रथम श्री गणेशाला वंदन केले जाते. त्यानंतर इतर देवतांना वंदन करतात. चव्हाटयावर खेळांनी नृत्य केल्यानंतर ग्रामदेवतेचे निशाण, कापड खेळे, ढोल,वादक, गावातील मानकरी व इतर गावकरी यांच्या घरी नृत्य करतात.

आली आली कोल्हापूरची बाय

आंब्याच्या पानानं वळदेव केलं

चिंचेच्या पानानं सतदेव केलं.

अशा गीतांच्या तालावर ढोल टाळाच्या गजरात कापडखेळे गोलाकार नृत्य करतात. प्रस्तुत कापडखेळयांचे वैशिष्टय़ म्हणजे इतिहासकालीन मावळयांच्या पगडीसारखा पगडया,फेटे डोक्याला बांधलेले असतात. अंगात शर्ट व कमरेला गोलाकार साडया गुंडाळलेल्या असतात. हातात काठी व रूमाल घेऊन फेर धरून नृत्य करतात. या खेळयांना देवखेळे असेही म्हणतात. देवगड तालुक्यात सात दिवसाचा शिमगा असतो. सातव्या दिवशी गावाच्या चव्हाटय़ावर कापडखेळे पुन्हा नृत्य करतात.शेवटी ढोल टाळयांचा गजरात कापडखेळयांचा वांदरउडीचा व टिपरी मारण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर शिमग्याची समाप्ती होते.

देवगड तालुक्यातील गाबीत समाजातही शिमग्याला फाग नृत्य करण्याची प्रथा आहे. प्रथम गावच्या होळीच्या मांडावर गीते घुमटाच्या तालावर सादर केली जातात.त्यांना फाग गीते असे म्हणतात. फाग गीते गायिली जातात त्या वेळी वेगवेगळी सोंगे मांडावर येऊन नृत्य करतात.या फागनृत्यनाटयचा प्रारंभ गणेशस्तवनाने होतो. प्रारंभी घुमटावर थाप मारल्यानंतर फाग गायन सुरू होते-

उदा.गणपती मुळारंभी फाग-

पहिले नमन धरतरे मातेला

नमन पहिले धरता रे मातेला

अशा पद्धतीने धरणी,आकार,परमेश्वर,गणपती यांना नमन केले जाते. त्यानंतर इतर फाग गीते गायिली जातात.

उदा. देवगती, देवता वाडेगती माता थोर

भक्तांचा सांभाळ करी

विघ्नांचा संहार करी..विघ्नांचा संहार करी

गाबीत शिमगोत्सवात पाच दिवस फागनृत्ये सादर होतात. गणपती मुळारंभी फाग याशिवाय इतर पौराणिक, ऐतिहासिक फाग,देवदेवतांचे फाग गायिले जातात. तेव्हा सोंगे घुमटाच्या तालावर नृत्य करतात. शिमग्याच्या शेवटच्या दिवशी मांडावर आरती व गा-हाणे करून फाग नृत्याची व शिमग्याची समाप्ती होते.

एकूणच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुतेक सर्व सण उत्सवांच्या विशेषतः नागपंचमी, गणेश चतुर्थी, दसरा,शिमगा या सण उत्सवांना वेगवेगळ्या लोक नृत्य प्रकारांचे सादरीकरण केले जाते.   कालामानानुसार या

लोकनृत्य प्रकारात बदल केले असले तरी विविध जाती जमातीच्या स्त्री-पुरुषांनी त्याचे मूळ रूप टिकवून ठेवलेले आहे. तसेच या सण उत्सवांनी सामाजिक एकोपा साधण्याबरोबर लोकसंस्कृती आणि लोककलांचे जतन करण्यास हातभार लावलेला आहे. सणवारांच्या निमित्ताने सादर केली जाणारी लोकनृत्ये लोकगीतांच्या द्रुत व विलंबित लयीवर सादर करतात. त्यांना घुमट, ढोल, ताशा, टाळ, कशाची थाळी, टिपरी आदींची साथ असते.बहुतेक सर्वलोकनृत्यांचा प्रारंभ लोककलांच्या सादरीकरणाच्या प्रथेनुसार ग्रामदेवता, देवदेवता, यांना वंदन, नमन करून त्यांचे स्तवन करून केला जातो.अपवाद फुगडी नृत्याचा आहे. ह्या लोकनृत्य सादरीकरणात लोकनृत्यप्रकारानुसार सहभागींची रचना वेगवेगळी असते.फुगडी नृत्यात स्त्रिया गोलाकार फेर धरून नृत्य करीत असतात तर धालोत्सवात दोन गट (फाटूया)करून स्त्रिया नृत्य करतात. चपई नृत्यात गोलाकार उभे राहून तर घुमट नृत्यात व फाग नृत्यात सहभागी अर्ध गोलकार उभे राहून मधोमध सोंगे,नर्तक नृत्य करतात. कापडखेळे गोलाकार उभे राहून नृत्य करतात.

लोकनृत्य सादर करणारे कलावंत लोकनृत्याच्या विशेष सराव करीत नाहीत. पण तरी त्यात अचूकता असते. सादरीकरणाच्यामागे भक्तीभाव,श्रद्धाभाव असतो.लोकनृत्ये सण-उत्सवांना साजरी केली जात असल्याने त्यात तोचतोचपणा असतो. गीतामध्येही तोचतोचपणा असतो. अलिकडच्या काळात फुगडीनृत्य,चपई नृत्य,शिमग्यातील राधानृत्य व इतर सोंगांचे नृत्य यांना स्पर्धात्मक रुप प्राप्त झालेले दिसून येते. या लोकानृत्यांच्या स्पर्धा भरवल्या जातात. निकोप स्पर्धां मधून स्त्री-पुरुष यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न हा स्पृहणीय आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील या लोकनृत्यप्रकारांनी इथल्या कृषी संस्कृती बरोबर इथल्या लोक जीवनाचे, लोकसंस्कृतीचे जतन करण्यास निश्चितच हातभार लावलेला आहे असे म्हणता येईल.

**संदर्भसूची :**


- डॉ. पुष्पलता राजापुरे- तापस. कोकणातील लोककला-शब्दालय प्रकाशन, प्रथम आवृत्ती सप्टेंबर २०१४.
- भालचंद्र आकलेकर.कोकणचा सांस्कृतिक इतिहास-नवभारत प्रकाशन, २००३
- प्रा.रमेश कुबल, प्रा.डाॅ.अंकुश सारंग कोकणचा गाबीत शिमगोत्सव-अपर्णा प्रकाशन प्रथम आवृत्ती मार्च २००३
- महाराष्ट्रीय ज्ञानकोश विभाग १२,महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ नागपूर १९२४.
- दुर्गा भागवत- लोकसाहित्याची रुपरेखा वरदा बुक्स १९५६.